# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, कृषि नगर, अकोला - ४४४१०४
## अर्थ प्रशासन विभाग

दुरध्वनी क्र.०७२४-२२५८४६९ फॅक्स क्र.०७२४-२४५८८७३

**नियंत्रक :** श्री. आर.आर. कटारे E- mail: comptroller@pdkv.ac.in


जा.क्र. वि.प्र.वि./अंदाज/भा.कृ.अ.प./२०२२-२०२३/ 934/2022 दिनांकः 20/8/2022

## परिपत्रक

भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत अखिल भारतीय समन्वयित संशोधन प्रकल्प (७५:२५), कृषि विज्ञान केंद्रे (१००%) या योजनेच्या आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, भारतीय कृषि अनुसंधान परिषदेस सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर सन २०२२-२०२३ चे अनुदान वितरीत करण्यात येते. सदर अनुदान विद्यापीठास प्राप्त न झाल्यास संबंधित प्रकल्पामध्ये कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनाचा व कार्यालयीन आकस्मिक खर्चाची अनुदानाअभावी देयतेचा प्रश्न निर्माण होवू शकतो. सन २०२१-२०२२ मधील योजनांचे उपयोगिता प्रमाणपत्रे या कार्यालयाकडून तयार करण्याकरीता ब-याच कार्यालयांनी माहे मार्च, २०२२ चे मासिक खर्चाचे विवरणपत्रे या विभागास अद्यापपर्यंत सादर केलेली नाहीत. करीता संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी प्रथम प्राधान्याने आपले अधिनस्त असलेल्या अखिल भारतीय समन्वयित संशोधन प्रकल्प (७५:२५), कृषि विज्ञान केंद्रे (१००%) या योजनांचे माहे मार्च, २०२२ महिन्याचे मासिक खर्चाचे विवरणपत्रे दिनांक १० मे, २०२२ पर्यंत सादर करण्यात यावे. उपरोक्त विहित कालमर्यादेत उपयोगीता प्रमाणपत्र सादर न झाल्यास कोणत्याही योजनांचे अनुदान संबंधीत एजन्सीने थांबविल्यास, विलंब झाल्यास, रोखून धरल्यामुळे निधिअभावी वेतन न झाल्यास त्यासाठी संबंधीत योजनांचे आहरण व संवितरण अधिकारी हे जबाबदार राहतील.

करीता उपयोगीता प्रमाणपत्रांच्या कामांना प्रथम प्राधान्य देऊन त्वरीत कार्यवाही करण्यात यावी, जेणेकरुन सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षासाठी प्राप्त झालेल्या निधीचे वितरण आदेश या कार्यालयाकडून निर्गमित करणे सोईचे होईल.

स्वा-
नियंत्रक,
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

प्रतिलीपीः

१ मा. अधिष्ठाता (कृषि), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
२ मा. संचालक संशोधन, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
३ मा. संचालक, विस्तार शिक्षण, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
४ मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
५ वेतन व लेखाधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला / नागपूर यांना माहितीस व पुढील कार्यवाहीस अग्रेषीत...
६ प्रभारी अधिकारी, कृषी संशोधन संगणक प्रणाली माहीती कक्ष, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना विद्यापीठ संकेतस्थळावर पत्र प्रसिध्दीसाठी अग्रेषित.

Officer In Charge, Agricultural Research System Cell, Dr. P.D.K.V. Akola
Inward No. 29/04/22
Dt.: 12

नियंत्रक,